0 9 MAY 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बारावीनंतरही शिक्षणाची संधी

## महाजन : आज माहिती देण्यासाठी स्कूल कनेक्ट अभियानाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०ची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यात येत असून या धोरणाच्या अनुषंगाने येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी स्तरावरील अनेक महत्त्वाचे नवे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात येत आहेत. त्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी विद्यापीठाने आज गुरुवारी (दि. ९) सायंकाळी ५ वाजता येथील दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे 'स्कूल कनेक्ट अभियान' आयोजित केल्याची माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन आणि मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी दिली.

विद्यापीठामध्ये बहुतांश अभ्यासक्रम हे पदव्युत्तर स्तरावरील आहेत. महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठात प्रवेश घेता येतो. काही वर्षांपूर्वीपासून विद्यापीठात बी.टेक. अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम तंत्रज्ञान अधिविभागात सुरू आहेत. त्यानंतर स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अँड टेक्नॉलॉजीअंतर्गत बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स (पाच वर्षे एकात्मिक) अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. या दोन्ही अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.



- महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठात प्रवेश घेता येतो.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत विद्यापीठांना नवीन व अद्यावत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहित
- येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी स्तरावरील महत्त्वाचे अभ्यासक्रम

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत विद्यापीठांना नवीन व अद्यावत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. या धोरणाला सकारात्मक प्रतिसाद देताना विद्यापीठाने आता २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतरचे पदवीस्तरीय अनेक अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन केले आहे. यामध्ये उपरोक्त दोन्ही अभ्यासक्रमांखेरीज बी.ए. स्पोर्ट्स, बी.ए. फिल्म मेकिंग, बी.कॉम. बँकिंग अँड फायनान्स, बी.एस्सी.-एम.एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक), बी.सी.ए., बी.एस्सी.- एम.एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग), बी.एस्सी.-बी.एड. (चार वर्षे एकात्मिक) आणि एम.बी.ए. (एकात्मिक चार वर्षे) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या सर्व अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी 'स्कूल कनेक्ट अभियान' हाती घेण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
0 9 MAY 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे 'स्कूल कनेक्ट अभियाना'चे आयोजन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०ची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात येत असून, या धोरणाच्या अनुषंगाने येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी स्तरावरील अनेक महत्त्वाचे नवे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात येत आहेत. त्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी विद्यापीठाने गुरुवार, दि. ९ मे रोजी सायंकाळी ५ वाजता दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे स्कूल कनेक्ट अभियानाचे आयोजन केले आहे.

विद्यापीठामध्ये बहुतांश अभ्यासक्रम पदव्युत्तर स्तरावरील आहेत. मात्र, काही वर्षांपूर्वीपासून विद्यापीठात बी. टेक. अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम तंत्रज्ञान अधिविभागात सुरू



आहेत. त्यानंतर स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अँड टेक्नॉलॉजीअंतर्गत बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स (पाच वर्षे एकात्मिक) अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत विद्यापीठांना नवीन व अद्ययावत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे.

येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतरचे पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू करण्याचे योजिले आहे. यामध्ये बी. ए. स्पोर्टस्, बी.ए. फिल्म मेकिंग, बी. कॉम. बँकिंग अँड फायनान्स, बी.एस्सी.-एम.एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक), बी.सी.ए.,बी.एस्सी.-एम. एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग), बी.एस्सी.-बी.एड. (चार वर्षे एकात्मिक) आणि एम.बी.ए. (एकात्मिक चार वर्षे) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. याबरोबरच विद्यापीठाच्या ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण केंद्रामार्फतही ऑनलाईन एमबीएसह इतरही अनेक महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत. या सर्व अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी विद्यापीठातर्फे 'स्कूल कनेक्ट अभियान' हाती घेण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
0 9 MAY 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे आज स्कूल कनेक्ट अभियान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी स्तरावरील अनेक महत्त्वाचे नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. त्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी विद्यापीठाने दि. ९ रोजी सायंकाळी ५ वाजता येथील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे 'स्कूल कनेक्ट अभियाना'चे आयोजन केले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत विद्यापीठांना नवीन व अद्ययावत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. या धोरणाला सकारात्मक प्रतिसाद देताना विद्यापीठातर्फे आता २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतरचे पदवीस्तरीय अनेक अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. बी.ए. स्पोर्टस्, बी.ए. फिल्म मेकिंग, बी.कॉम. बँकिंग अँड फायनान्स, बी.एस्सी., एम.एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक), बी.सी.ए., बी.एस्सी., एम.एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशिन लर्निंग), बी.एस्सी., बी.एड. (चार वर्षे एकात्मिक) आणि एम.बी.ए. (एकात्मिक चार वर्षे) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण केंद्रामार्फतही ऑनलाईन एम.बी.ए.सह इतरही अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन व मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले आहे.

0 9 MAY 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे आज 'स्कूल कनेक्ट' अभियान

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठात यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी स्तरावरील विविध महत्त्वाचे नवे अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. त्याची माहिती देण्यासाठी विद्यापीठातर्फे उद्या (गुरुवारी) सायंकाळी पाच वाजता येथील दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये 'स्कूल कनेक्ट' अभियानांतर्गत मार्गदर्शन शिबिरहोणार आहे.

बी. ए. स्पोर्टस्, बी. ए. फिल्म मेकिंग, बी. कॉम. बँकिंग अँड फायनान्स, बी. एस्सी., एम. एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक), बी. सी. ए., बी. एस्सी., एम. एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग), बी. एस्सी., बी. एड. (चार वर्षे एकात्मिक) आणि एम. बी. ए. (एकात्मिक चार वर्षे) असे नवे अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण केंद्रातर्फेही ऑनलाईन एम. बी. ए. सह इतरही अनेक महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व अभ्यासक्रमांची इच्छुक विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांना माहिती देण्यासाठी विद्यापीठाने 'स्कूल कनेक्ट' अभियान हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत होणाऱ्या विशेष शिबिरात त्या-त्या विषयांचे तज्ज्ञ, अभ्यासक्रम समन्वयक आणि अधिविभागांचे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी दिली.

09 MAY 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# यंदा नवे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्याची तयारी

## महाविद्यालयांना 'ॲकॅडमिक कॅलेंडर'ची प्रतीक्षा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : महाविद्यालयांचे नवे शैक्षणिक वर्ष यंदा वेळेत सुरू करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) देशभरातील विद्यापीठांना केली आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने काम सुरू केले आहे. महाविद्यालयांना विद्यापीठाच्या 'ॲकॅडमिक कॅलेंडर'ची प्रतीक्षा लागली आहे.

कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांत शैक्षणिक वर्षांची सुरुवात, उन्हाळी आणि हिवाळी सत्र परीक्षांचे वेळापत्रक पुढे सरकले. निकालदेखील लांबणीवर पडला. त्याचा निश्चितपणे शैक्षणिक क्षेत्रावर परिणाम झाला. आता या क्षेत्रात सुसूत्रता आणण्यासाठी युजीसीने महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याबाबतचे निर्देश विद्यापीठांना दिले आहेत. पदवीपूर्व अभ्यासक्रमांचे वर्ग वेळेवर सुरू करण्याबाबतच्या सूचनेचा देखील त्यामध्ये समावेश



आहे. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने पावले टाकली आहेत. सत्र प्रारंभ आणि समाप्तीचा कालावधी, प्रवेश प्रक्रिया, सत्रनिहाय अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कालावधी, परीक्षांचे वेळापत्रक, आदींचा समावेश या ॲकॅडमिक कॅलेंडरमध्ये असतो. या कॅलेंडरनुसार कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांकडून दरवर्षी नियोजन केले जाते. विद्यापीठात यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे कॅलेंडर तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. विद्यापीठ कॅम्पसमधील अधिविभाग साधारणतः एक जून, तर त्यानंतर महाविद्यालयांतील वर्ग सुरू होतील. यादृष्टीने विद्यापीठाचे नियोजन सुरू आहे.

### बारावीचा निकाल २५ मे पूर्वी जाहीर होणार

**राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इयत्ता बारावीचा निकाल २५ मे पूर्वी जाहीर होण्याची शक्यता आहे. ते झाल्यास वरिष्ठ महाविद्यालयांना पदवी प्रथम वर्षाच्या (फर्स्ट ईअर) प्रवेशाच्या तयारीसाठी धावपळ करावी लागणार आहे. सध्या महाविद्यालयांना पदवी प्रथम, द्वितीय वर्षांतील परीक्षा घेऊन गुण विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे सादर करण्याची लगबग सुरू आहे.**

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- **विद्यापीठातील अधिविभाग ................ ३४**
- **संलग्नित महाविद्यालये ..................... २७६**
- **विद्यार्थी ........................................ २ लाख ५५ हजार १७५**

"शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्याचे नियोजन केले आहे. त्यादृष्टीने ॲकॅडमिक कॅलेंडर तयार करण्याचे काम स्वतंत्र टीममार्फत सुरू आहे. या महिन्याच्या अखेरपर्यंत ते काम पूर्ण केले जाईल.
**-डॉ. एस. डी. डेळेकर,** संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष